खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

## लेख ९) '...आणि बुध्दाचा जन्म होतो' : मनोज बोरगावकर

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## ‘साहित्यारंग’ पाठ्यपुस्तक

# लेख ९) '...आणि बुध्दाचा जन्म होतो' : मनोज बोरगावकर

### लेखक परिचय :

राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत. **'कोरा कागद निळी शाई' (कवितासंग्रह), 'अकथ कहाणी सद्गुणांची' (ललित गद्य) आणि 'नदीष्ट' कादंबरी इत्यादी ग्रंथांचे लेखन केले.**

### या लेखाचा आशय :

**'...आणि बुध्दाचा जन्म होतो',** हा मनोज बोरगावकर यांचा लेख आहे. हा लेख आत्मचिंतनाच्या पातळीवरील **असून 'करुणा' या मूल्याचा उद्घोष करणारा आहे.**

**आपण दैनंदिन जीवनात अनेक शब्दांचा सहज वापर करतो. ते शब्द एवढे विकारांनी लडबडलेले असतात,** की त्यांचा मूळ अर्थ कधीच हरवून गेलेला असतो. याची प्रचिती लेखकाला अंधविद्यालयात आली. **'गर्जा महाराष्ट्र माझा'** हे गीत त्या अंध मुलांनी त्वेषाने सादर केले. 'गर्जा' या शब्दाचा त्यांचा उच्चार आणि चेहऱ्यावरचे हावभाव एवढे मनस्वी होते, की 'गर्जा' हा शब्द लेखकाला प्रथमच ऐकतोय असे वाटू लागले.

**'करुणा'** या शब्दाचा वापर ऐकताना त्याचा 'आत्मा' हरवला आहे, असे वाटते. कारण त्याच्या मागे अवतीभवती स्वार्थ, हिशेबीपणा आदींचे छानसे डेकोरेशन उभे केलेले असते. या स्पष्टीकरणासाठी लेखक एका **'फकीरा'ची गोष्ट सांगतो.** फकीर जंगलात पत्नीसह झोपडीत राहत असतो. एके दिवशी प्रचंड पाऊस येतो. रात्रीच्या वेळी फकीर पत्नीसह दाटीवाटीने झोपडीत झोपलेला असताना दरवाजा वाजतो. एक वाटसरू त्यांना घेण्याची विनंती करतो. फकिराची बायको विरोध करते. फकीर म्हणतो, झोपायला जागा नाही; पण आपण पाय पसरून बसू शकतो. असे बोलताना **त्या फकिराचा स्वर बाहेरच्या पावसापेक्षा अधिक भिजलेला असतो.** वाटसरु आत आल्यावर **'संकटात सापडणाऱ्यांना मदत करणे हीच करूणा' असे बोलतो. जेव्हा काही वेळाने दुसरा वाटसरु दरवाजा वाजवतो, तेव्हा मात्र पहिला वाटसरू आणि फकिराची बायको त्याला आत घेण्यास विरोध करतात. फकीर मात्र त्यालाही आत घेतो.**



SANJAY MAR HRM

पुन्हा एकदा दरवाजा वाजल्यावर अगोदरचे दोन वाटसरू आणि फकिराची पत्नी तीव्र विरोध करतात. आता कोणालाही आत घेऊ नका, आपल्याला बसायला जागा नाही. आत आल्यानंतर ते वाटसरू क्षणभरात बाहेर असतानाची अवस्था विसरलेले असतात. तरीही त्यांचे न ऐकता फकीर दरवाजा उघडतो. दरवाज्यात गाढव उभे असते. थंडीने कुडकुडत असते. दोन वाटसरू आणि फकिराची बायको यांचा टोकाचा विरोध नाकारू फकीर गाढवाला आत घेतो. प्रसंगी स्वतः बाहेर थांबेल, असे त्यांना सांगतो. **अपार अशा चांगुलपणासमोर वाईटाला चडफडण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहत नाही. अस्सल जातिवंत 'करूणा'च फकिराच्या रुपाने आपल्या समोर साक्षात उभी राहते.**

**गौतम बुद्धांची ओळख करुणेचे महास्त्रोत अशी.** बुध्दांना कोणीतरी विचारले की, **"तुम्ही बुध्द म्हणून जन्माला येणार हे केव्हा निश्चित झाले?"** बुध्द म्हणाले, "मागच्या जन्मी मी एक हत्ती होतो. एक दिवस जंगलात आग लागली. सारे प्राणी सैरावैरा धावू लागले. मी सगळ्यात विशाल प्राणी म्हणून सारेच प्राणी माझ्या पाठोपाठ धावू लागले. मी क्षणभरासाठी उसंत घ्यावी म्हणून थांबलो आणि पुन्हा पाहण्यासाठी पाय उचलला तर पायाखाली ससा येऊन विसावला होता. आता मी पाय उचलला तर तो ससा चिरडून मरणार... माझ्या मनात त्या सशाविषयी अपार करुणा दाटून आली... मी एकही पाय उचलला नाही आणि तिथेच जळून खाक झालो**. ती करूणाच माझ्यातल्या बुद्ध म्हणून जन्माला येण्याचा क्षण."** म्हणून लेखक म्हणतात, मला **करूणा हाच 'बुद्धाचा' पर्यायी शब्द वाटत आला आहे.** आपल्या अवतीभोवती वावरणाऱ्या प्रत्येक माणसाची जगण्याची पद्धती, शैली खूप वेगळाली. पण तरीही सारेच दु:खी. **आपण त्या गोष्टीतल्या फकिराची करुणा अंगीकारली तर आपण सुखी नाही होणार कदाचित पण दुखी मात्र नक्कीच होणार नाही.**

**'करूणा'सोबत असली आणि आपण ती सोडून दिली की काय परिणाम होतो, याचे उदाहरण लेखक सांगतात.** एक निर्मळ मनाचा तरुण गावाकडच्या नदीवर फिरायला जात असे. त्याच्या स्वच्छ, निर्मळपणामुळे पक्षी त्याच्या अंगाखांद्यावर मनोसक्त खेळत. पंचक्रोशीत या पक्ष्यांचं त्या तरुणावरील प्रेम हा कुतूहलाचा आणि जिव्हाळ्याचा विषय होता. तरुणाचा बाप वयस्कर आणि आजाराने खंगलेला होता. तो मुलाचे कौतुक ऐकून त्याला घरी दोन पक्षी घेऊन येण्याविषयी सांगतो. पक्ष्यांना पकडण्याचा विचार घेऊन तो तरूण त्या



SANJAY MAR HIRM

दिवशी संध्याकाळी नदीवर जातो. **त्याच्या मनातली परिवर्तने पक्ष्यांच्या लगेचच ध्यानात येतात आणि त्या दिवशी एकही पक्षी त्याच्या अंगावर येऊन बसत नाही. करूणा आणि करूणेशिवाय माणसांमध्ये किती अंतर पडलेलं असतं, याचं उद्बोधक उदाहरण लेखकाने वरीलप्रमाणे दिलेले आहे.**

**या लेखाचे विशेष**

**'.... आणि बुद्धाचा जन्म होतो' या मनोज बोरगावकर यांच्या लेखातून भाषेमध्ये निव्वळ शब्द नसतात तर त्यामागे अर्थ आणि मूल्ये असतात, याची जाणीव करून देणारा आहे. जीवनातील ही मूल्य अंगी बनवल्याशिवाय माणसाच्या वर्तनाला अर्थ नसतो. अर्थाशिवाय शब्द व्यर्थ असतात, त्याप्रमाणे मूल्यविरहित वर्तन व्यर्थ ठरते. हा प्रगल्भ विचार या लेखातून येतो. आत्मचिंतनाच्या वळणाने जाणाऱ्या या लेखाला मूल्यविचारांचे अधिष्ठान आहे. छोटी,चपलख उदाहरणे, प्रवाही भाषायोजना यामुळे हा लेख एक मूल्यभान देतो.**

---

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे ,**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MARATHI FIRM